2 2 JUN 2023

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात योग दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष योगसाधना शिबिराने उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सकाळी ७.२० ते ८.४५ या कालावधीत योगसाधना शिबिर पार पडले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

या शिबिरात प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले सहभागी झाले.

उचगावचे योगशिक्षक सूरज पाटील यांनी उपस्थितांना योगसाधनेचे प्रशिक्षण दिले.



शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त बुधवारी आयोजित विशेष योगसाधना शिबिरात मोठ्या प्रमाणात योगसाधक सहभागी झाले.

22 JUN 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योगाच्या सकारात्मक ऊर्जेने सूर्यनारायणाला नमस्कार

## शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये योग दिनी योगाचे प्रशिक्षण-योग तज्ज्ञांनी सांगितले योगाचे महत्व

**२१ जून. जागतिक योग दिन. शहर परिसरात सूर्यनारायणाच्या सोनेरी किरणांचे योगाच्या प्रात्यक्षिकांनी स्वागत झाले. जागतिक योग दिनी शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालयांसह सामाजिक संघटनांची योगानेच दिवसाची सुरूवात झाली. योगसाधनेच्या सहाय्याने प्रत्येकाला सकारात्मक ऊर्जा मिळते. सर्वांनी नियमित योगा करुन आपले आरोग्य उत्तम ठेवावे, असा सल्ला अनेक योग तज्ज्ञांनी दिला.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठातील योगप्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. पाटील म्हणाले, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेनुसार २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. जगभरातील १७५ देशांमध्ये या निमित्ताने योगसाधना केली जाते. गेल्या नऊ वर्षापासून दैनंदिन स्वरुपात विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये मोफत योग शिबीर घेतले जाते. योगसाधना शिबिरात प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, शिक्षक, प्रशासकीय सेवक, नागरिक, विद्यार्थी योगसाधन शिबिरात सहभागी झाले. योगशिक्षक सूरज पाटील यांनी उपस्थितांना योगसाधनेचे प्रशिक्षण दिले. विद्यापीठाशी संलग्नित २८६ महाविद्यालयांतही आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रात्यक्षिकांचे आयोजन केले होते.

**विवेकानंद कॉलेज**

मन, बुद्धी आणि भावना यांचा सुंदर मिलाप होऊन जीवनातील यशस्वीता सिद्ध होण्याकरता योग उपयोगी पडतो. योग आणि प्राणायाम जीवन निरामय सुंदर व आनंदी राखून संपन्न करता येते सर्वांनी नियमितपणे योग आणि प्राणायाम करावे असा सल्ला योगतज्ज्ञ सीमा नायर यांनी दिला. योगामुळे नैराश्य, चिंता, तणाव कमी होऊन मानसिक आरोग्य सुधारते, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. यावेळी आयक्यूएससीच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी, सुनीता भोसले, जितेंद्र भरमगोंडा, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. संतोष कुंडलं, डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील, डॉ. शुभांगी काळे, सी. बी. दोडमणी; शिल्पा भोसले आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात योगासने करताना अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, नागरिक.

**शहाजी महाविद्यालय**

शहाजी छत्रपती महाविद्यालयात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यशवंतराव चव्हाण सभागृहात योगाची प्रात्यक्षिके सादर केली. आचार्य योगेश्वरानंद अवधूत यांनी योगासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. आर. के. शानेदिवाण रणजीत पाटील, डॉ. प्रशांत पाटील, प्रशांत मोटे, अधीक्षक मनीष भोसले, अजित साळुंखे, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव संगीता बोंद्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

**शांतीनिकेतन स्कूल**

शांतीनिकेतन स्कूलमध्ये योग दिनानिमित्त योगाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी सादर केली. विद्यार्थ्यांना संचालिका जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत योगाचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**यशवंतराव भाऊराव पाटील विद्यालय**

जागतिक योग दिनानिमित्त कै. यशवंतराव भाऊराव पाटील विद्यालयात योगदिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक गौतमी पाटील, निता पाटील, वैशाली गावडे, शितल भांगरे, रामराजे सुतार, दत्तातय चौगुले, संदिप कांबळे, शर्मिला पाटील आदी उपस्थित होते.

**केएमसी कॉलेज**

यशवंतराव चव्हाण (के एम सी कॉलेज) च्या एन.सी.सी. विभागाच्यावतीने बुधवारी योगा दिनानिमित्त ग्राऊंडवर योगा डे मोठ्या उत्साहात साजरा केला. कॉलेजच्यावतीने ७ दिवस योग शिबिराचे आयोजन . केलें होते. या शिबिरामध्ये योगाचे महत्त्व व योगाचे प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले. के एम सी कॉलेज, शाहू दयानंद हायस्कूल, इंदिरा गांधी स्कूलच्या ८२ एन.सी.सी. कॅडिडेट व तीन एन.सी.सी. ऑफिसर, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे नियोजन लेफ्ट डॉ. अमित रेडेकर, से ऑफिसर अजित कारंडे, ऑफिसर संग्राम सोनार, प्रा. संदीप गावित यांनी केले. योग प्रशिक्षक म्हणून ॲड. उदयराज बडसकर यांनी प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमासाठी मनपाच्या उपायुक्त शिल्पा दरेकर, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अरुण पोडमल, ५६ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विजयंत थोरात यांचे मार्गदर्शन लाभले.


पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात योग दिन उत्साहात

योगसाधनेच्या साहाय्याने प्रत्येकाने आपल्या दिवसाची दैनंदिन सुरुवात सकारात्मक ऊर्जेने करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आज आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष योगसाधना शिबिराने उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी उपस्थितांना संबोधित करताना प्र-कुलगुरू डॉ. पाटील बोलत होते. बुधवारी सकाळी शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये योगसाधना शिबिर पार पडले. या शिबिरात विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्यासह नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनीही सहभागी झाल्या होत्या. उचगावचे योग शिक्षक सूरज पाटील यांनी उपस्थितांना योगसाधनेचे प्रशिक्षण दिले. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित २८६ महाविद्यालयांतही आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
22 JUN 2023
लोकसत्ता
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘योग’दिनी कोल्हापुरात उपक्रमांना प्रतिसाद



लोकसत्ता प्रतिनिधी

कोल्हापूर : कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योगदिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यामध्ये विविध थरातील लोकांनी प्रतिसाद दिला. जिल्हाधिकारी कार्यालयात योगपटूंसह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच बालयोगपटूंनी योगाची प्रात्यक्षिके सादर केली. ‘करा योग... रहा निरोगी’ असा मूलमंत्र जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे यांनी दिला.

**योगाची चित्तथरारक प्रात्यक्षिके**

संयुक्त योगा प्रोटोकॉलमधील ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन, अर्ध हालासन यासारखी योगासने तसेच प्राणायाम व ध्यान करण्यात आले. आंतरराष्ट्रीय योगपटू पूर्वा किनरे व प्राप्ती किनरे यांनी योगाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली.

**२८६ महाविद्यालयांचा सहभाग**

शिवाजी विद्यापीठात योगसाधना शिबिरात शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्यासह नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. उचगावचे योगशिक्षक सूरज पाटील यांनी योगसाधनेचे प्रशिक्षण दिले. संलग्नित २८६ महाविद्यालयांतही योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

## सांगलीत प्रात्यक्षिके

सांगली : जागतिक योग दिनानिमित्त जिल्ह्यात बुधवारी सकाळी जिल्ह्यात सर्वत्र योगदिन साजरा करण्यात आला. या योगदिनाचे औचित्य साधून सांगलीमध्ये महापालिका, जिल्हा क्रीडा विभाग, पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नवमहाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानात योगाची प्रात्यक्षिके करण्यात आली. यामध्ये पालकमंत्री सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, महापालिका आयुक्त सुनील पवार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी पतंजलीच्या योग समितीच्या अनिता जोशी यांनी सर्वांना योगाचे प्रकार, महत्त्व सांगत उभे आणि बैठे योगा प्रकारचे सादरीकरण करीत सर्वांकडून ते करवून घेतले. यावेळी बोलताना कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येकाला आपल्या शरीराकडे पाहायला वेळ नाही. त्यामुळे प्रत्येकाने दररोज पंधरा मिनिटे आपल्या शरीरासाठी दिल्यास आपण आरोग्य संपन्न जीवन जगू शकतो असे सांगत दैनंदिन योगा प्रत्येकाने करावा असे आवाहन केले.

## शहर परिसरातील विविध संस्था, शाळा, महाविद्यालयांत प्रात्यक्षिके व मार्गदर्शन

# योग दिनाचा आरोग्यदायी 'योग'

**कोल्हापूर, ता. २१ : शहर परिसरातील विविध संस्था, शाळा, महाविद्यालयांमध्ये नववा आंतरराष्ट्रीय योग दिन अपूर्व उत्साहात साजरा झाला. विविध योगांची आसने प्रत्येकाने करत योगासनाचे महत्त्व समजावून घेतले. अनेक शाळांमध्ये रॅलीचे आयोजन केले.**

**शिवाजी विद्यापीठ**

योगसाधनेच्या साह्याने प्रत्येकाने दिवसाची दैनंदिन सुरुवात सकारात्मक ऊर्जेने करावी,' असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष योगसाधना शिबिराने साजरा झाला. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये योगसाधना शिबिर घेतले. डॉ. पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. योगसाधना शिबिरात प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले सहभागी झाले. उचगावचे योग शिक्षक सूरज पाटील यांनी योगसाधनेचे प्रशिक्षण दिले. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित २८६ महाविद्यालयांतही आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

पुढारी

# एम.फिल., प्री-पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षेची नोंदणी, अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २४ जुलै रोजी एम.फिल., प्री-पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर नोंदणी व अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने संलग्न महाविद्यालये व अधिविभागांना काढले आहे. ज्या विद्यार्थ्यांचे कोर्स वर्क पूर्ण झाले आहे, केवळ अशाच विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरायचे आहेत. कोर्स वर्क न झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. रिसर्च अँड पब्लिकेशन इथिक्स या एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांनी केलेली नोंदणी पोस्ट रजिस्ट्रेशन कोर्सवर्क थेअरीकरिता ग्राह्य होणार आहे. मार्च आणि ऑक्टोबर-२०२१ मध्ये कोर्स वर्क परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी परिपत्रकानुसार कार्यप्रणालीचा वापर करावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

सकाळ

# विविध २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षेला १२८१ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बी. टेक., एम. एस्सी., एमसीए., बीसीए., बी. एस्सी., एम. एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अशा विविध २८ पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवारी झाल्या. त्यासाठी एकूण १२८१ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या कालावधीत विद्यापीठाच्या भरारी पथकाने सातारा जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर कारवाई केली. त्यात तीन विद्यार्थी कॉपी करताना पकडण्यात आले. त्यांच्यावर परीक्षा प्रमाद समिती विद्यापीठ नियमानुसार कारवाई करणार आहे. एम.ए. म्युझिक, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन, आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने जाहीर केले.

लोकमत

# आर. डी. पडवळ यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्लेसमेंट समन्वयक डॉ. आर. डी. पडवळ यांचे 'भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकास' या विषयावर आज गुरुवारी दुपारी १२ वाजता विशेष ऑनलाइन व्याख्यान आयोजित केले आहे. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र अंतर्गत विभागीय केंद्र, सांगली, सांगलीतील मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, मिरज येथील कन्या महाविद्यालय व सांगलीतील राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय यांच्यातर्फे व्याख्यानाचे आयोजन केल्याचे प्रा. डॉ. डी.के. मोरे यांनी सांगितले.

लोकमत

# राधानगरी धरणास 'टेक्नॉलॉजी'च्या विद्यार्थ्यांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी राधानगरी धरणास भेट देत धरणाचे बांधकाम, तंत्रज्ञान जाणून घेतले.

धरणाची उंची, साठवण क्षमता तसेच वीजनिर्मिती केंद्र याशिवाय विविध भागांची पाहणी केली. तेथील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. महेश साळुंखे, प्रा. महेश लोखंडे, वैशाली शित्तूरकर आदींसह ८० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षेत तीन गैरप्रकार

कोल्हापूर : विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या मार्च-एप्रिलमधील २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. या परीक्षेला ९२८१ विद्यार्थी बसले होते. तर सातारा जिल्ह्यात तीन गैरप्रकार उघडकीस आले. याची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणांप्रमाणे परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.